१ मे २००९,महाराष्ट्र दिन,फिलाडेल्फिया

# कथा हलाहलाची

ऐका हो ऐका कथा ही हलाहलाची
शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांची. . .
देशद्रोही राज्यकर्त्यांची. . .
निगरगट्ट नोकरशहांची. . .
विकल्या गेलेल्या पत्रकारांची–संपादकांची
निष्क्रीय मध्यमवर्गाची
हिजडया बुद्धिवंतांची!
भारताच्या सर्वनाशाची. . .

कंपन्यांत कंपनी एक 'मॉन्सॅन्टो' अमेरिकेची
आहे तिची एकाधिकारशाही बी–बियाणांची
आणि तिजपाशी क्लुप्ती
. . . बियाणे विषारी बनवण्याची.

( फार पूर्वी झाले होते समुद्रमंथन
आणि झाली होती निर्मिती
महाभयानक हलाहलाची
तसेच केले विज्ञान–मंथन
अमेरिकेने
आणि केली निर्मिती या
सर्वनाशक विषारी बियाणे तंत्राची )

असे हे भयानक तंत्र
शक्ति त्यात उगवून आलेलं पीक
वांझ करण्याची

अन् परागीकरणातून
दुसरं चांगलं वाण
नपुंसक करण्याची

कंपनीची इच्छा जगाला
गुलाम करण्याची
दिसली तिला बाजारपेठ
आपल्या दुर्दैवी भारताची
सुटली तिला हाव पैशाची

बाजारपेठ भारताची मोठी
लक्षावधी शेतकऱ्यांची
शिवाय यातले बहुतेक
गरीब आणि भोळे
त्यांना बाधा अडाणीपणाची
. . . आणि निरक्षरतेची
काय कळणार त्या बिचाऱ्यांना
लबाडी कंपनीची
आणि हरामखोरी
आपल्याच राज्यकर्त्यांची

कंपनीनं केली योजना
बियाणांच्या मार्गातून
देशावर कब्जा करण्याची
आणि लढवली शक्कल
भारतात घुसण्याची
मिळाले राज्यकर्ते
अगदी त्यांना हवे होते तसे
देशद्रोही, हरामी

आणि पैशाचे लालची
स्वतः च्या आईलाही विकतील ते
नाही त्यांना जनाची वा मनाची
भेट झाली त्यांची आणि
देशाच्या कृषिमंत्र्याची
( ओळख होतीच कंपनीला
एन्रॉन भ्रष्टाचाराच्या सूत्रधाराची )
ठकास व्हावी गळाभेट महाठकाची
तशी झाली दोस्ती दोघा पाताळयंत्र्यांची
वरून झाली कृपा प्रधानमंत्र्यांची
आणि गोऱ्या चामडीच्या महाराणीची
पक्की जमली टोळी देशद्रोही बदमाशांची
स्विस बँकेत पडली रास
कोटयावधी डॉलर्सची
झाली पूर्ण तयारी
भारतमातेचा गळा घोटण्याची

घुसवली बियाणे भारतात
महाभयंकर विषाची
गरीब, भोळया, निरक्षर कास्तकऱ्यांना
काय कल्पना या षडयंत्राची?
बघता बघता नष्ट झाली
अमोघ बी–बियाणे
भारताची
कपाशी गव्हाची
तांदुळ भाजीपाल्याची

एक होता काळ असा

होती देशात रेलचेल
सर्वोत्तम गव्हाची अन् तुरीची
भारत होता जन्मभूमी
आंबेमोहोर अन् कमोदची
तांदळाच्या हजारो जातींची

होता स्वतंत्र शेतकरी देशाचा
होता हक्क त्याला आणि संधी
दहा चांगल्या बियाणांतून
स्वतःचं बियाण निवडण्याची
. . . आणि चांगलं आलेलं पीक
बियाण म्हणून साठवण्याची
एकमेकांत वाटण्याची

आता ती संपली.

आली आता दुर्दैवी वेळ
दरवर्षी कंपनीचं बियाण विकत घेण्याची
( येणाऱ्या पिकात
शक्तिच नाही रुजण्याची
हीच तर जादू भयानक
त्या बीटी बियाणांची )
त्या महागाच्या विषारी वाणांसाठी
कर्जबाजारी होण्याची
ते एकच एक विषारी बियाण पेरण्याची
त्यातून उगवेल ते विषारी धान्य गिळण्याची
त्यांचा विषारी चारा गुरांना चारण्याची
आणि त्यांचं विषारी दूध

अमृत समजून पिण्याची

आता पुन्हा आली वेळ
परक्या कंपनीचे गुलाम होण्याची
( आठवण तुम्हा आहे नां
त्या ब्रिटिश ईस्ट ईंडिया कंपनीची?
तो काळ होता पुराणा
आता आहे पायरी पुढची
ही नवी गुलामी
राहणार आहे . . . कायमची )
कंपनीला धंदा महत्वाचा
काय किंमत तिला
तुमच्या स्वातंत्र्याची?
तुम्ही मेला की जगला
कंपनीनं कां पर्वा करावी त्याची?
नाही परवडली शेती तुम्हाला,
तर वाट आहे मोकळी
मुंबईच्या झोपडपट्टयांची
. . . किंवा आत्महत्त्या करण्याची.

होत नाही इथे अखेर
देशाच्या नष्टचर्याची
या विषारी वाणांतून
झाली आहे निर्मिती
भीषण विषाणूंची
चालवली आहे त्यांनी हत्त्या
देशाच्या सर्व झाडांची
आंबा, लिंबाची

वडा पिंपळाची
कडुलिंबाची
सागाची आणि संत्र्यांची
लागते आहे वाट आता
देशाच्या सर्व जंगलांची
सुजला सुफला भारतभूमी
कोणे एके काळची
लवकरच होईल जागा
एका प्रचंड वाळवंटाची

अशी ही करुण कहाणी
भारतियांच्या कर्मदारिद्रयाची
देशद्रोही राज्यकर्त्यांची. . .
निगरगट्ट नोकरशहांची. . .
विकल्या गेलेल्या पत्रकार–संपादकांची
निष्क्रीय मध्यमवर्गाची
हिजडया बुद्धिवंतांची!
कंठशोष करून सांगतो
पण ऐकणार आहे कोण?
वेळ झालीए संध्याकाळची
टीव्हीवरच्या टुक्कार
सिरीयल्स बघण्याची
टीव्हीवरच्या टुक्कार
सिरीयल्स बघण्याची. . .

मिलिन्द रानडे